**कुंडल विकास, प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने), कुंडल**
मु.पो.- कुंडल, तालुका - पलुस, जिल्हा- सांगली-४१६३०९महाराष्ट्र
दूरध्वनी क्रमांक -०२३४६- २७१२१२ ई - मेल -princpalkundal@gmail.com

जा.क्र/कक्ष -४/ भांडार/रोपवाटिका सल्लागार/ १८६८ दिनांक : ०३ /१२/२०२५

प्रति,

.....................................................
.....................................................
.....................................................

**विषय :- कुंडल वन प्रबोधिनीमधील रोपवाटीकेची कामे करण्यासाठी तज्ञ सल्लागार यांची सेवा घेणेबाबत .**

उपरोक्त विषयांकीत प्रकरणी, कुंडल विकास प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनीमधील मौजे कुंडल ता. पलूस येथील गट नं. २९५९ कंपार्टमेंट नं. ९३ मधील २ एकर क्षेत्रावरील क्षेत्रीय संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांना रोपवाटीका व्यवस्थापनाबाबत प्रात्याक्षिक देणे, रोपवाटीका व्यवस्थापनाचे तंत्र शिकवणे व वन प्रबोधिनीस लागणाऱ्या विविध जंगली रोपांची व उद्यांनाकरिता विविध शोभिवंत रोपांची निर्मिती करणे तसेच जागेवर आवश्यकतेनुसार पायाभूत सुविधा जसे की, शेडनेट हाऊस, पॉली हाऊस, मिस्ट चेंबर व C.C.P.H इत्यादीबाबत पायाभूत व आधुनिक सोयी-सुविधांयुक्त रोपवाटिका तयार करणे प्रस्तावित आहे.तसेच सदर सोयी-सुविधा करणेकामी आवश्यक तांत्रिक नैपुण्य असलेल्या सल्लागाराची नेमणूक करणे प्रस्तावित आहे. त्याकरीता खालील प्रमाणे नमूद कामांकरीता दरपत्रके मागणी करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अंदाजित कामांचा तपशील | सेवा दर (%) |
|---|---|---|
| १. | शेडनेट हाऊस | |
| २. | पॉली हाऊस | |
| ३. | मिस्ट चेंबर | |
| ४. | C.C.P.H | |
| ५. | इतर अनुषंगिक कामे | |

त्यानुषंगाने, जागेवर स्थळपाहणी करणे, अंदाजपत्रके तयार करणे, DPR बनवणे, सक्षम प्रधिकाऱ्याची तांत्रिक मंजूरी घेणे, काम प्रत्यक्ष सुरु झाल्यानंतर कामाचे सनियंत्रण करणे, देखरेख व तपासणी करणे इत्यादी कामे सल्लागाराने करणे अपेक्षित आहे. तसेच दरपत्रके प्राप्त झाल्यानंतर प्रबोधिनीच्या स्तरावर गठीत तांत्रिक समितीच्या मान्यतेनुसार सल्लागार यांची नियुक्ती करण्यात येईल.तसेच कामाचे दर हे एकूण कामांच्या अंदाजित किमतींच्या टक्केवारीच्या प्रमाणात नमूद करावेत.

सदरचे दरपत्रक हे मोहोरबंद लिफाफ्यात महासंचालक, कुंडल विकास, प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने), कुंडल ता.पलूस जि.सांगली पिन कोड ४१६ ३०९ पत्त्यावर ७ दिवसांच्या आत पाठवावे.

KSyadav

( के. एस. यादव )
**प्रशिक्षण कार्यक्रम समन्वयक**
**कुंडल विकास, प्रशासन व व्यवस्थापन**
**प्रबोधिनी (वने), कुंडल**